जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# मेडिकल कॉलेज अहिल्यानगर शहरातच करा अन्यथा 'उपोषण' करणार : खा. निलेश लंके

नगर - केंद्र सरकारने मंजूर केलेले वैद्यकीय महाविद्यालय जर नगर शहरामध्ये झाले नाही तर आपण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा महाविकास आघाडीच्यावतीने खासदार निलेश लंके यांनी पत्रकारांशी दिला. दरम्यान मंजूर झालेले मेडिकल कॉलेज शिर्डी या ठिकाणी होऊ देणार नाही, असे म्हणत त्यांनी एक प्रकारे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे नाव न घेता त्यांना सूचक इशारा दिला आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांना या संदर्भात निवेदन दिले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव, युवा सेनेचे विक्रम राठोड, नगरसेवक योगीराज गाडे, प्रा. सिताराम काकडे, रामेश्वर निमसे आदि उपस्थित होते.



मेडिकल कॉलेज संदर्भात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना निवेदन देताना खा. नीलेश लंके. समवेत विक्रम राठोड, योगीराज गाडे आदि उपस्थित होते. (छाया - लहू दळवी)

खासदार लंके म्हणाले, मी ज्यावेळेस संसदेमध्ये गेलो त्यावेळेस पासून नगर शहरामध्ये वैद्यकीय महाविद्यालय व्हावे, याकरता आवाज उठवलेला आहे. दोन वेळेला मी त्या संदर्भामध्ये केंद्र सरकारकडे पत्रव्यवहार सुद्धा केलेला आहे. तसेच याकरता संबंधित मंत्र्यांना सुद्धा आपण भेटलो असल्याचेही त्यांनी सांगितले. वास्तविक पाहता हे मेडिकल कॉलेज म्हणजेच वैद्यकीय महाविद्यालय हे नगर शहरामध्ये होणे अत्यंत गरजेचे आहे. शहरालगत जी काही दळणवळणाची सोय सुविधा आहे, ती मिळाली पाहिजे तसेच जिल्हा रुग्णालयाचा सुद्धा याकरता उपयोग झाला पाहिजे, हे त्या मागचे कारण आहे. सध्या हे महाविद्यालय इतरत्र कुठल्यातरी तालुक्यात घालवण्याचा घाट हा कुणीतरी राजकीय व्यक्ती करत आहे किंवा सत्तेचा ते दुरुपयोग करत आहे, असा आरोपही त्यांनी यावेळी करत कोणत्याही प्रकारे अशा प्रकारचे महाविद्यालय उत्तर भागामध्ये किंवा इतरत्र जाऊ देणार नाही. वेळप्रसंगी आपण आंदोलन करू, उपोषण करू, असा इशारा सुद्धा खासदार लंके यांनी दिला आहे.

कोणत्याही परिस्थितीमध्ये हे महाविद्यालय दुसऱ्या तालुक्यामध्ये गेले नाही पाहिजे, ही माझी स्पष्ट भूमिका आहे व यापुढे राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनासुद्धा पत्र देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

हे वैद्यकीय महाविद्यालय नगर शहराजवळ व्हावे, याकरता एक कमिटी सुद्धा केंद्र सरकारने पाठवलेले आहे. त्या कमिटीला सुद्धा आपण असा असाच प्रस्ताव देणार आहोत. तसेच शहर हे मध्यवर्ती केंद्र आहे. त्यामुळे शहरामध्ये सर्व सुविधा मिळू शकतात हा त्याचा भाग आहे. अनेकजण पारनेरमध्ये सुद्धा हे महाविद्यालय व्हावे, असे म्हणत होते पण ते दळणवळणाच्या दृष्टिकोनातून योग्य नाही, असे ते म्हणाले.

## शहरालगत आहेत जागा

शहरामध्ये शासकीय जागा उपलब्ध असून इंद्रायणी हॉटेलच्या बाजूला २५ एकर जागा आहे. त्याचबरोबर विळद या ठिकाणी सुद्धा कृषी विभागाची जागा २५ ते ४० एकर आहे. त्याचप्रमाणे अरणगाव या ठिकाणी जे काही टीबी सेंटर उभारण्यात आलेले होते, ती सुद्धा आज जागा पडिक आहे. त्याचा सुद्धा वापर या ठिकाणी होऊ शकतो. अशा अनेक जागा शासनाच्या आहेत. त्यामुळे त्या जागा शहरालगत असल्यामुळे त्याचा फायदा होईल. या जागा आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना सुचवल्या असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## विखेंना दिला सुचक इशारा

शिर्डी या ठिकाणी मेडिकल कॉलेज व्हावे, त्यासाठी साईबाबा संस्थान यांचे सुद्धा हॉस्पिटल आहे असे सांगितले जाते. मात्र हे काही संयुक्तिक नाही. नगर शहर हे मध्यवर्ती भाग आहे. या ठिकाणी दळणवळण सोपे आहे. त्यामुळे जर हे महाविद्यालय नगरमध्ये झाले नाही तर आपण निश्चितपणे आंदोलन उपोषण करू, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

## दक्षिणेचे पदाधिकारी एक नाही

शासनाचे विविध योजना येतात, विविध प्रकल्प येतात, मात्र ते इतर जिल्ह्यांमध्ये सत्तेचा गैरवापर करून हलवले जातात, ती सुद्धा वस्तुस्थिती आहे. त्यामुळे एक प्रकारे दक्षिणेला पदाधिकाऱ्यांची इच्छाशक्ती एकत्र येत नाही अशी खंत सुद्धा खासदार लंके यांनी उपस्थित केली. मात्र आपण आता त्यासाठी स्वतः सर्व राज्यकर्ते तसेच पदाधिकारी यांची एकत्रितपणे भेट घेऊन या प्रश्नासंदर्भामध्ये बोलणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## विभाजन झाले तर चालेल

अहिल्यानगर जिल्हा हा सर्वाधिक भौगोलिकदृष्ट्या मोठ्या जिल्हा आहे. या जिल्ह्यामध्ये बारा तालुके आहेत त्यामुळे या ठिकाणी जिल्हाधिकारी असो अथवा पोलीस अधीक्षक असो यांना काम करण्यासाठी वेळ असा पुरत नाही व त्यामुळे कामाचे नियोजन योग्य पद्धतीने होत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या नियोजनासाठी जर आपल्याला जिल्हा विभाजन झाले तर निश्चितपणे त्याचा उपयोग होईल मात्र दुसरीकडे जे कोणी हे करत नसेल किंवा ज्यांनी ते होणार नाही असे वक्तव्य केले असतील, त्याच्या वक्तव्यांकडे आपण न पाहता विभाजन झाले पाहिजे, असे माझे मत असल्याचे ते म्हणाले.

## ढवळपुरीच्या प्रकल्पात संदर्भात निर्णय घेऊ

ढवळपुरी या ठिकाणी शेळी मेंढी पालन जे प्रकल्प राज्य सरकारने या ठिकाणी मंजूर केलेला होता, तो सुद्धा उत्तर भागामध्ये वळवण्याचा प्रकार झाला हे सुद्धा योग्य नाही. त्या संदर्भात सुद्धा आपण आवाज उठवू, असे खासदार लंके म्हणाले.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

"मुसाफिर"-९८२२०२०६९१



### पाणी टंचाईच्या झळा - जल बचतीकडे वळा

मार्च-एप्रिलपासूनच खेड्यांपासून महानगरांत पाणी टंचाईच्या झळा दिसू लागल्यात. आपल्या राज्यात बहुसंख्य जिल्ह्यात गावोगावी, वाड्यावस्तींपासून शहरांतील अनेक सोसायटी गृहप्रकल्पात टँकर फेऱ्या वाढल्या आहेत.

या उष्ण मे महिन्यात तर टंचाई परमोच्च आहे. धरणांपासून बोअरींगमधील पाण्याची पातळी खालावली असून प्रखर उष्णतेने बाष्पीभवनही खूप वाढले आहे.

नेमेचि येतो हा जीवघेणे उन्हाळा... पण... अनेक वर्षांपासून भूगर्भातले पाणी उपसणे नियंत्रणात आणण्यासाठी कायदा अस्तित्वात असला तरी त्याची गंभीर अंमलबजावणी होतच नाही.

महाराष्ट्रात नगर, महानगरांसह, खेड्यापायात थक्क करणारा विस्तार, वाढणारी लोकसंख्या गंभीर असून, त्यामुळे अस्वच्छता, पाण्याचे दुर्भिक्ष्य, बकालपणा खूपच वाढला आहे. पाण्यासाठी रांगाच रांगा व वादविवाद दिसून येत आहे.

जवळपास सगळीकडेच टँकरच्या फेऱ्या वाढल्या आहेत. या टँकरचे मालक, व्यवस्थापन सर्व स्तरावरील राजकीय व लोकप्रितिनिधी किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांकडेच असल्याचे म्हणतात. हा खरं तर संशयाचा, संशोधनाचा विषय आहे व राहील.

पाणी त्यातही शुद्ध पिण्याचे व शेतीचे यावर शासक, प्रशासक गांभीर्याने पाहात आलेले दिसत नाही का? जलशिवार, शहरात मीटरने पाणी, ठिबक सिंचनाची सक्ती, मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड व संवर्धन यांना प्राधान्य द्यावे लागेल. सरकार एकटे करू शकत नसले तरी संबंधितांना प्रोत्साहन, आर्थिक पाठबळ, नागरिकांना करसवलत, अनुदान देऊन जीवनाच्या या मुलभूत समस्याला आवाक्यात ठेवता येईल आणि हे गरजेचे कारण सोप्प आहे... 'जल है तो कल है...'

## जयवर्धनजी म.सा. यांची २० मे रोजी नगरमध्ये समारोपाची 'महामंगलिक'

नगर - मंगलजापसाठी प्रसिद्ध असलेले मौनसाधक साधनापटू जयवर्धनजी (पियुष) म.सा. यांची समारोपाची महामांगलिक २० मे रोजी दुपारी ११.३० वाजता तापीदास गल्ली, केवल आगरबत्ती, महावीर कॉम्प्लेक्स येथे होणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जय जीन जाप भक्ती मंडळ यांनी केले आहे.

## वाहन विक्रेत्यांनी दुचाकी खरेदीदारास हेल्मेट पुरवावे

नगर - दुचाकी वाहन विक्रेत्यांनी दुचाकी विक्रीवेळी खरेदीदारास दोन हेल्मेट पुरविण्याच्या परिवहन विभागाने सूचना दिल्या असून, वाहन नोंदणीसाठी कार्यालयात सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये दुचाकीसोबत दोन हेल्मेट पुरविल्याबाबत पुरावा सादर करण्याच्या सूचनाही वाहन वितरकांना देण्यात आल्या आहेत. या सूचनांचे वाहन विक्रेत्यांनी तंतोतंत पालन करावे. सूचनांचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास मोटार वाहन नियम क्र. १९८९ च्या नियम १३८ उपनियम ४ (फ) नुसार संबंधितांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी, अहिल्यानगर यांनी कळविले आहे.

## पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिलेचे गंठण पळविले

नगर - सकाळच्या सुमारास फिरायला गेलेल्या एका वृध्द महिलेला पत्ता विचारण्याचा बहाणा करून त्यांच्या जवळ जात त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दीड तोळ्याचे गंठण दोन अनोळखी दुचाकीस्वारांनी हिसकावून नेले. १७ मे रोजी सकाळी पावणे सहाच्या सुमारास अरणगाव रस्त्यावर हनुमाननगर परिसरात खामकर गिरणीच्या बोर्ड जवळ ही घटना घडली.

याबाबत विद्या विजय पटेकर (वय ५९ रा. सुरज हॉटेलच्या पाठीमागे, इंदिरानगर, अहिल्यानगर- दौंड रस्ता) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. विद्या या फिरायला गेल्या असता, सकाळी सुमारे ५:४५ वाजता खामकर गिरणीजवळील बोर्डाजवळ दोन अनोळखी इसम दुचाकीवर येऊन थांबले. त्यांनी शितल शिंदे कोठे राहते? असा प्रश्न विचारत विद्या यांच्याजवळ येऊन उभे राहिले. या गोंधळातच मागे बसलेल्या इसमाने क्षणाचाही विलंब न करता गळ्यातील सुमारे दीड तोळ्याचे सोन्याचे गंठण जबरदस्तीने ओढून हिसकावून घेतले आणि दोघेही घटनास्थळावरून दुचाकीवरून पळून गेले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख करीत आहेत.

# आर्थिक कारणावरुन एकाचे अपहरण करुन मारहाण; अभिषेक कळमकरसह ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - आर्थिक कारणावरुन एकाचे अपहरण करुन वेगवेगळ्या ठिकाणी डांबून ठेवून काठीने तसेच लाथाबुक्क्यानी मारहाण करुन शिवीगाळ दमदाटी करीत हातपाय तोडण्याची धमकी देऊन बळजबरीने नोटरी करुन घेतल्याची घटना १२ मे रोजी दुपारी ३ ते १७ मे रोजी पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान नगर ते सोलापूर रोडवरील मूठ्ठी चौक सर्कल पुलाजवळ घडली. या प्रकरणी अभिषेक कळमकर यांच्यासह ९ जणांवर भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रवींद्र रामदास शेळके (वय ३८, रा. कोल्हेवाडी, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीत म्हटले आहे की आर्थिक कारणावरुन अभिषेक कळमकर (रा. अ. नगर) यांनी मच्छिंद्र झेंडे (पूर्ण नाव माहित नाही. रा. चिखली, ता. श्रीगोंदा), लालू उर्फ अभिषेक जगताप (रा. अ.नगर) लोखंडे मावशी (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही.) व ५ अनोळखी इसम यांच्या मदतीने फिर्यादी रवींद्र शेळके यांना नगर सोलापूर रोडवरील मुठ्ठी चौक सर्कल जवळून एक टोयोटा कंपनीची पांढऱ्या रंगाची कार (क्र. एम एच १६ डी एफ ४४४७) मध्ये बळजबरीने बसवून त्यांचे अपहरण केले. तसेच फिर्यादी यांना वेगवेगळ्या ठिकाणी डांबून ठेवून काठीने तसेच लाथाबुक्याने मारहाण करीत शिवीगाळ दमदाटी केली. आणि हातपाय तोडण्याची धमकी देऊन फिर्यादी यांच्याकडून जबरदस्तीने नोटऱ्या करून घेतल्या असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादीवरुन भिंगार कॅम्प पोलिसांनी अभिषेक कळमकर यांच्यासह नऊ जणाविरुद्ध बी एन एस २०२३ चे कलम १४० (३), १४२, ३०८ (२)(३)(५), १८९(२), १९०, ११५ (२), ११८ (१), ३५१ (२), ३५२ नुसार गुन्हा दाखल केला.

अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर हे करीत आहे.

## महापालिका कर्मचारी तुकाराम कोतकर यांचे निधन

नगर - महापालिकेच्या बांधकाम विभागात कार्यरत असलेले



तुकाराम आबाजी कोतकर (वय ५५ वर्षे, रा. रभाजीनगर, केडगाव) यांचे १७ मे रोजी रात्री हृदयविकाराने निधन झाले. ते दुपारी घरी झोपले होते, रात्री उशिरापर्यंत ते उठले नाहीत. त्यांना कुटुंबीयांनी उठवण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांची काही हालचाल झाली नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी त्यांना बेशुद्धावस्थेत उपचारासाठी नगरमधील खाजगी रुग्णालयात दाखल केले. तेथे रात्री ११ च्या सुमारास त्यांना डॉक्टरांनी मयत घोषित केले.

त्यांच्यावर १८ मे रोजी केडगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणी आनंदऋषी हॉस्पीटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन शेटे यांनी दिलेल्या माहितीवरुन कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत कोतकर हे महापालिकेत कार्यरत होते. अनेक वर्ष अतिक्रमण विभागात काम केल्यानंतर सध्या ते बांधकाम विभागात कार्यरत होते. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, सून आणि नात असा परिवार आहे.

# खांबात वीज प्रवाह उतरल्याने शॉक बसून २ शेळ्यांचा मृत्यू



नगर - शहरामध्ये नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे रस्त्याच्या कडेला असलेल्या खांबा मध्ये वीज प्रवाह उतरल्याने विजेचा शॉक बसून दोन शेळ्या मृत्युमुखी पडल्या. ही घटना १८ मे रोजी शहरातील धरती चौक येथील काळूबागवान गल्ली येथे घडली.

शहरात झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसाने शहरात मोठे नुकसान केले असून धरती चौक हातमपुरा येथे दोन शेळ्यांचा जीव गेला. यादरम्यान येथील नागरिकांनी महावितरणच्या कार्यालयात वारंवार फोन केला असता नागरिकांचे फोन कर्मचाऱ्यांनी उचलले नाहीत. बऱ्याच वेळानंतर महावितरणचे कर्मचारी घटनास्थळी आले व त्यांनी धरती चौक परिसरातील विद्युत पुरवठा बंद केला.

या दुर्घटनेत जर त्या शेळ्या ऐवजी लहान मुल अगर मनुष्य हानी झाली असती तर त्या जबाबदार कोण? असा प्रश्न या भागातील ज्येष्ठ नागरिक इमरान बागवान यांनी उपस्थित केला आहे.

# गांजा विक्री करणाऱ्यांना पकडले



नगर - शरीरास व मनोव्यापारास घातक असलेला गांजा हा अंमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगणाऱ्या दोघांना भिंगार कॅम्प पोलिसांनी पकडले. त्यांच्याकडून साडेनऊ किलो गांजासह मोटारसायकल असा १ लाख १० हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई भिंगार येथील बेलेश्वर चौका जवळील मोकळ्या मैदानात १८ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास केली.

भिंगार कॅम्प पोलिसांना माहिती मिळाली की दोन इसम मोटारसायकलवर गांजा विक्री करण्याकरीता बेलेश्वर चौकाजवळील मोकळ्या मैदानात थांबलेले आहेत. ही माहिती मिळताच भिंगार कॅम्प पोलिसांनी त्या ठिकाणी तत्काळ जाऊन मैदानात मोटारसायकल जवळ उभे असलेल्या दोघांना ताब्यात घेऊन त्यांना त्यांची नावे व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव संभाजी छगन गर्जे (वय ३१, रा. मेहेकरी, ता. नगर), विजय अनिल साळवे (वय ३८ रा. इमामपूर ता. नगर. हल्ली रा.गांधीनगर, बोल्हेगाव) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्यांना येथे का थांबले अशी विचारणा केली असता त्यांनी समाधानकारक उत्तर दिले नाही. पोलिसांनी त्यांची झडती घेतली असता, त्यांच्या मोटारसायकलचे डिक्कीत ९५ हजार रुपये किमतीचा ९ किलो ५५० ग्रॅम वजनाचा हिरव्या रंगाचा उग्र वासाचा गांजा मिळून आला. पोलिसांनी त्यांच्याकडील गांजा व १५ हजार रुपये किमतीची हिरो होंडा कंपनीची सीडी डॉन मोटारसायकल (क्र.एमएच १६ झेड ३५१५) असा १ लाख १० हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलिसांनी पोलीस अंमलदार रवींद्र टकले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संभाजी गर्जे व विजय साळवे यांच्याविरुद्ध एन डी पी एस १९८५ चे कलम ८ (क) २० (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला.

अधिक तपास पोलीस उप निरीक्षक गजेंद्र इंगळे हे करीत आहेत.

## सौ. सिंधु देशमुख यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर - गुलमोहोर रोड येथील मंगल हौसिंग सोसायटीतील



रहिवासी सौ. सिंधु शरद देशमुख (वय ८१) यांचे १८ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, सुन, नातु असा परिवार आहे. सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचचे पदाधिकारी शरद देशमुख यांच्या त्या पत्नी तर शशांक देशमुख यांच्या मातोश्री होत.

# शिवसेनेचे दिलीप सातपुते यांच्या कारचा भीषण अपघात; एकाचा मृत्यू

### दोन जण जखमी

नगर - शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख दिलीप सातपुते यांच्या चारचाकी वाहनाचा १७ मे रोजी रात्री उशिरा अपघात झाला. जामखेड रोडवर नगर तालुक्यातील सारोळा बद्दी येथे कार पुलावरून खाली कोसळली. यात कार पलटी झाली असून कारमधील एकाचा मृत्यू झाला आहे. तर कारचालक व सातपुते हे जखमी झाले आहेत.



तलाठी महेंद्र मालन काळे (वय ४०, रा. भूषणनगर, केडगाव) असे मयताचे नाव आहे. तर कार चालक भाऊ कांडेकर हे जखमी झाले आहेत. सातपुते व त्यांचे सहकारी १७ मे बीड येथे लग्नासाठी गेले होते. तेथून परतताना रात्री बाराच्या सुमारास सारोळा बद्दी येथे त्यांची कार अचानक छोट्या पुलावरून खाली कोसळली. यात कार पलटी झाल्याने कारमधील तलाठी काळे यांचा मृत्यू झाला. अपघातात सातपुते हे बचावले आहेत तर कार चालक कांडेकर हे जखमी झाले आहेत. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक एकनाथ आव्हाड करत आहेत.

## डॉ. जय नारंग यांचे अपघाती निधन

श्रीरामपूर - डॉ. जय त्रिलोक नारंग (वय ३०) यांचे रविवारी



सायंकाळी अपघाती निधन झाले. त्यांच्या पश्चात आजी, आई - वडील, एक भाऊ, एक बहिण, चुलते, चुलत बंधू असा परिवार आहे.

डॉ. नारंग हे त्रिलोक मेडिकलचे मालक त्रिलोक नानकचंद नारंग यांचे थोरले चिरंजीव, ओम मेडिकलचे मालक ओमप्रकाश नारंग याचे पुतणे, प्रतिक नारंग यांचे बंधू, ओमसाई मेडिकलचे मालक संजय नारंग यांचे चुलत बंधू होत.

# कत्तलीसाठी जनावरांची वाहतूक करणारा टेम्पो पकडला

नगर - कत्तल करण्यासाठी टेम्पोमध्ये जनावरे दाटीवाटीने भरून त्यांची वाहतूक करणारा टेम्पो नगर तालुका पोलिसांनी पकडला. या कारवाईत ४ म्हशी व १३ रेडे यांच्यासह टेम्पो असा १३ लाख १२ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई १७ मे रोजी रात्री साडे नऊ वाजण्याचे सुमारास सोलापूर रोडवर वाळुंज बायपास येथे केली.

या बाबतची माहिती अशी की नगर तालुका पोलिसांना माहिती मिळाली की सोलापूर ते बेल्हा जाणाऱ्या रोडने जनावरांची कत्तल करण्याच्या उद्देशाने वाहतूक करणारा टेम्पो जात आहे. अशी माहिती मिळाल्याने नगर तालुका पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन वाळूंज बायपास जवळ अशोका कंपनीचा टेम्पो (क्र.एम एच ०३ इ जी ६१६८ ) संशयावरुन थांबवला. पोलिसांनी टेम्पोची पाहणी केली असता टेम्पोच्या हौद्या मध्ये ४ म्हशी व १३ रेडे यांना चारापाण्याची व्यवस्था न करता दाटीवाटीने बांधलेले असलेल्याचे दिसले. पोलिसांनी टेम्पोचालकास त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव मुसरीफ मोहम्मद फकिर (वय ३५ रा. जुना एस.टी. स्टॅण्ड समोर, जुन्नर, जि.पुणे) असे असल्याचे सांगितले. टेम्पोतील जनावराबाबत विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाही. यावरुन पोलिसांनी टेम्पोतील ६० हजार रुपये किमतीच्या ४ म्हशी, ५२ हजार रुपये किंमतीचे म्हैस जातीचे १३ रेडे, १२ लाख रुपये किंमतीचे, अशोका लेलन्ड कंपनीचे, १९१५ मॉडेलचे वाहन (क्र.एम एच ०३ इ जी ६१६८ ) असा एकूण १३ लाख १२ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करुन टेम्पो चालकास ताब्यात घेतले .

या प्रकरणी नगर तालुका पोलिसांनी अविनाश सरोदे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन टेम्पो चालकाविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ चे कलम ९ (अ) सह प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करणेबाबत अधि. १९६० चे कलम ११ (१) (ड) मोटार वाहन कायदा अधिनियम १९८८ चे कलम ८३,१७७ भा. न्या. सं. २०२३ चे कलम ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला. अधिक तपास पोलिस उप निरीक्षक भरत धुमाळ हे करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.



गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयात आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन करताना आयुर्वेद शास्त्र सेवा मांडळाचे सहसचिव सचिन जगताप.

# वर्षातून २ ते ३ वेळा रक्तदान करून कर्तव्य पार पाडावे : सचिन जगताप

### गुणे आयुर्वेद महाविद्यालयात रक्तदान शिबिरास प्रतिसाद

नगर – विज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी अद्याप कोणीही रक्त तयार करू शकले नाही. त्यामुळे रक्ताची गरज ही केवळ रक्तदानानेच पूर्ण होऊ शकते. त्यामुळे सर्व नागरिकांनी वर्षातून २ ते ३ वेळा रक्तदान करून आपले कर्तव्य पार पाडावे. गुणे आयुर्वेद महाविद्यालयाने रक्ताची कमतरता भरून काढण्यासाठी शिबिराचे आयोजन करून कौतुकास्पद उपक्रम राबवला आहे, असे प्रतिपादन आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे सहसचिव सचिन जगताप यांनी केले.

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ व गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयात, अहिल्यानगर मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन सचिन जगताप यांनी दीपप्रज्वलनाने केले. यावेळी संस्थेचे मानद सचिव डॉ.विजय भंडारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे, उपप्राचार्य डॉ. सुरज ठाकूर आदींसह प्राध्यापक, जनकल्याण रक्तकेंद्राचे पदाधिकारी व विद्यार्थी उपस्थित होते. जनकल्याण रक्तकेंद्राने रक्त संकलनाचे काम केले.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे म्हणाले, भारतात सध्या युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत सुरु असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर आपत्कालीन परिस्थितीत रक्त साठा मुबलक ठेवणे गरजेचे आहे. रक्ताचा तुटवडा भासु नये यासाठी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने केलेल्या सूचनेनुसार रक्तदान शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत करण्यात आले आहे, या शिबिरास विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला आहे.

यावेळी मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष अहिल्यानगरचे समन्वयक डॉ.निळकंठ ठाकरे, डॉ.रुपाली म्हसे, डॉ.शिनगारे, डॉ. उत्क्रांती सलगरे, डॉ.जोशी, सुशील बजाज, सत्यनारायण झंवर, चंद्रकांत औशीकर, सोनाली खांडरे आदींसह सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

# सक्कर चौक ते काटवन खंडोबा चौक रस्त्याला स्वर्गीय अरूणकाका जगताप यांचे नाव द्यावे

### नवीन टिळक रोड येथील नागरिकांनी व व्यापाऱ्यांची महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे मागणी



सक्कर चौक ते काटवन खंडोबा चौक (नवीन टिळक रोड) या रस्त्याला माजी आमादार स्वर्गीय अरूणकाका बलभिमराव जगताप यांचे नाव द्यावे अशा मागणीचे निवेदन आयुक्त यशवंत डांगे यांना देताना नागरिक.

नगर – माजी आमदार व माजी नगराध्यक्ष स्वर्गीय अरूणकाका जगताप यांचे नाव कायम स्वरूपी स्मरणात राहावे. यासाठी सक्कर चौक ते काटवन खंडोबा चौक या रोडला अरुणकाका बलभिमराव जगताप यांचे नाव देण्यात यावे. या मागणीचे निवेदन महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांना नविन टिळक रोड येथील स्थानिक नागरिक व व्यापारी वर्गाने केली आहे.

यावेळी राजेंद्र पडोळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष प्रा.माणिक विधाते, अनिल इवळे, गणेश कोल्हे, दिपक पाचारणे, अनिल शेकटकर, मंगेश खंगले, निखिल खामकर, विशाल भगत आदी उपस्थित होते.

अरुण काका जगताप यांची राजकीय, सामाजिक, शैक्षणिक कारकिंद या भागापासूनच सुरु झालेली होती. म्हणून आम्ही वरील विषयाची मागणी करत आहोत.

मागणीचा विचार करून सदर रोडला स्वर्गीय माजी आमदार अरूणकाका बलभिमराव जगताप यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी नवीन टिळक रोड येथील स्थानिक नागरिक व व्यापारी करीत आहेत.

# नगरमध्ये अरुणकाका जगतापांचा पुतळा उभारा : व्यापारी संघटनेची मागणी

### अरुणकाकांच्या रूपाने समस्त व्यापारी वर्गाचा मोठा आधार गेल्याच्या भावना शोकसभेत व्यक्त; व्यापारी संघटनांचे पदाधिकारी शोकसभेत गहिवरले



शहरातील सर्व व्यापारी संघटनांच्या वतीने दिवंगत माजी आमदार अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

नगर – माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या निधनाने शहरातील व जिल्ह्यातील व्यापारीवर्ग पोरका झाला आहे. सर्व व्यापारांना कायम सहकार्य करणारे काकांच्या रूपाने व्यापारीवर्गाचा मोठा आधार गेल्याच्या भावना विविध व्यापारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शोकसभेत व्यक्त केल्या. यावेळी अनेकांना भावना व्यक्त करताना गहिवरून आले. अरुणकाकांचा पुतळा अहिल्यानगर शहरात उभारण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

दिवंगत अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शहरातील सर्व व्यापारी संघटनांच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. मार्केटयार्ड येथील हनुमान मंदिरात झालेल्या या सभेस संघटनांचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. स्व. अरुणकाकांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून सर्वांनी श्रद्धांजली वाहून आमदार संग्राम जगताप यांचे सांत्वन केले. यावेळी आडते बाजार मर्चंट असोसिएशन, कृषी उत्पन्न बाजार समिती, हमाल पंचायत, फळ भाजीपाला मार्केट व्यापारी असोसिएशन, मिरची मर्चंट असोसिएशन, जॉग्री मर्चंट असोसिएशन, पशुखाद्य व्यापारी असोसिएशन, मार्केट यार्ड व्यापारी असोसिएशन, कडबा मार्केट असोसिएशन, तेल व्यापारी असोसिएशन, कांदा मार्केट असोसिएशन, फर्टिलायझर असोसिएशन अशा विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

आडते बाजार व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अशोक गांधी म्हणले, गेल्या ३० वर्षांपासून काकांचे व व्यापारी वर्गाचे घनिष्ठ संबंध होते. काका पदावर असो किंवा नसो त्यांच्या एका शब्दाने व्यापाऱ्यांचे प्रश्न मार्गी लागत असे.

कांदा मार्केटचे निखिल वारे म्हणाले, सर्व समाज, सर्व क्षेत्रातील नागरिकांशी अरुणकाकांचा वर्षानुवर्षाचा ऋणानुबंध होता. राजकारणात किंवा सामाजिक जीवनात अरुणकाकांनी दिलेला शब्द कधीही फिरवला नाही. सर्वांना समाधानी करणारे ते चालतं बोलत न्यायालय होते.

फळ भाजीपाला मार्केट व्यापारी असोसिएशनचे अशोक लाटे म्हणाले, अरुणकाकांच्या निधनाने सर्व व्यापारी वर्गाचा मोठा आधार गेला असून कधीही भरून न येणारी पोकळी निर्माण झाली आहे. काकांसारखी व्यक्ती परत होणे नाही.

श्रीगोपाल धूत म्हणाले, अरुणकाकांचा सर्व क्षेत्रावर प्रभुत्व व पगडा होता. रामकृष्ण शाळा उभारण्यासाठीही त्यांनी मोलाचे सहकार्य केले होते, असे चांगले व्यक्तिमत्व आपल्यातून गेल्याचा बळजबरीने विश्वास ठेवावा लागत आहे.

डॉ. विजय भंडारी म्हणाले, लहानपणापासूनचा वर्गमित्र गेल्याचे मोठे दुःख मला होत आहे. अरुणकाका जरी कमी शिकलेले असले तरी त्यांनी गुणे आयुर्वेद महाविद्यालयाच्या माध्यमातून शेकडो डॉक्टर घडवीले आहेत.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, अरुणकाका जगताप यांना कोणताही राजकीय वारसा नसतानाही त्यांनी जिल्ह्यावर राज्य केले. पण कधीही गर्व केला नाही. व्यापारी वर्गाला कायम सहकार्य करणारे ते देवमहर्षी होते.

हमाल पंचायतीचे अध्यक्ष अविनाश घुले म्हणाले, अरुणकाका गेल्याने लाखांचा पोशिंदा गेला आहे. राजासारखं मन व मनासारखा राजा असे काका होते. त्यांचे विचार व कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याने काकांचा पुतळा शहरात उभारावा, अशी मागणी त्यांनी केली.

गणेश भोसले म्हणाले, अरुणकाकांनी कायम सर्व व्यापारी वर्गाला प्रेम व जिव्हाळा देऊन सहकार्य केले. दिलेला शब्द पाळण्यात त्यांची खासियत होती. राजकारणातही त्यांनी अनेकांना मोठे करून विविध पदे मिळवून दिली. मात्र कधीही द्वेषाने राजकारण केले नाही.

राजेंद्र बोथरा म्हणाले, कायम हसतमुख असलेले अरुणकाकांचे सर्व स्तरातील नागरिकांशी घनिष्ठ संबंध होते. त्यांच्या सुस्वभावामुळे त्यांच्या कडे लोक आकर्षित होत असे.

प्रास्ताविक राजू शेटिया म्हणाले, सर्वांना मदतीचा हात देणारे काका धर्मवीर होते, महात्मा फुले चौकात अरुणकाकांची नित्याने बैठक असायची. माझ्यासह अनेकांना त्यांचा सहवास लाभल्याने आम्ही भाग्यवान आहोत.

यावेळी राजेंद्र चोपडा, अनिल पोखरणा, विजय महोळ, दामोदर भोसले, शशी घीगे, मर्चंट बँकेचे संचालक संजय बोरा, संजय चोपडा, विजय कोथिंबिरे, विपुल शहा, प्रकाश भागानगरे, आदेश चंगेडिया, ज्ञानेश्वर रासकर, धनेश कोठारी, गोपाल मणियार, संजय पिपाडा, दिलीप कोकाण, रमेश सोनीमंडलेचा, छबुराव हराळ, राम मेंघानी आदींनी स्व.अरुण जगताप यांच्या स्मृतींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. शोकसभेचे सूत्रसंचालन संतोष बोरा यांनी केले. विशाल पवार यांनी आभार मानले.

# नगर शहरात २५ ते ३० मे दरम्यान शास्त्रोक्त लाठी काठी प्रशिक्षण शिबीर



नगर – अहिल्यानगर शहरातील मुलामुलींसाठी २५ ते ३० मे दरम्यान दररोज सकाळी ६:३० ते ८ आणि सायंकाळी ४:३० ते ६ या वेळेत केशरगुलाब मंगल कार्यालय येथे सकल राजस्थानी व गुजराती समाजाच्या वतीने लाठी काठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आहे. पुणे येथील श्री शिवाजीराजे मर्दानी आखाडा या संस्थेचे तज्ज्ञ प्रशिक्षक सहभागी विद्यार्थ्यांना शास्त्रोक्त लाठी काठीचे प्रशिक्षण देणार आहेत. सर्व समाजातील १० वर्षांपूढील मुलामुलींना, महिला व पुरुषांना या शिबिरात सहभागी होता येईल, अशी माहिती भारत भारतीचे अध्यक्ष कमलेश भंडारी यांनी दिली.

शिबिराबद्दल अधिक माहिती देताना शैलेश मुनोत व धनेश कोठारी म्हणाले, आपत्कालीन परिस्थितीत स्व संरक्षण करता येणे खूप आवश्यक झाले आहे. यासाठीच सध्याच्या नव्या पिढीला सक्षम करण्यासाठी या लाठी काठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात अहिल्यानगर शहरातील जैन ओसवाल युवक संघ, बडीसाजन ओसवाल युवक संघ, माहेश्वरी युवक मंडळ, सकल राजस्थानी युवा मंच, जय आनंद महावीर युवक मंडळ, जय आनंद फाउंडेशन, दालमंडई, श्री महावीर प्रतिष्ठान ट्रस्ट, जितो अहिल्यानगर, जिंगर युवा मंच, वर्धमान युवक संघ, समस्त गुजराथी समाज, भारत भारती, जिजाऊ ग्रुप व वंदे मातरम युवा प्रतिष्ठान आदी संस्था सहभागी झाले आहेत.

अधिक माहितीसाठी अमित काबरा ९४२२२२१४४९, संदेश मुनोत ९४२२०८०१०७, पवन गुंदेचा ९९६००२१३१३ व हर्षल बोरा ९२२५५१५१५१ येथे संपर्क साधावा. शिबिराच्या यशस्वीतेसाठी कौशल पांडे, मनीष सोनग्रा, श्याम भुतडा, चेतन भंडारी, आलोक मुनोत, संभव काठेड, हितेन मेहता, प्रतिक बाबेल, रुपेश पारख, अमित काबरा आदी प्रयत्नशील आहेत.

### नेवासा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश अर्ज प्रक्रिया सुरू

नगर – शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नेवासा येथे विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी १४४ जागा उपलब्ध आहेत. इच्छुकांनी www.admission.devt.gov.in या संकेतस्थळावर जाऊन प्रवेश अर्ज भरण्याचे आवाहन प्राचार्य व्ही.व्ही. थोटे यांनी केले आहे.

ऑगस्ट २०२५ प्रवेश सत्रासाठी वेल्डर, प्लंबर, सिविंग टेक्नॉलॉजी, फिटर, वायरमन, इलेक्ट्रीशियन या व्यावसायिक कोर्ससाठी प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. उमेदवारांना २६ मे पासून व्यवसाय पसंती नोंदविण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे. याबाबत अधिक माहितीसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नेवासा येथे संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# बारावीच्या सीबीएसई बोर्ड परीक्षेत आयकॉन स्कूलचा उत्कृष्ट निकाल

### विज्ञान शाखेत संग्राम बोरूडे तर वाणिज्य शाखेत तन्मयी पादीर प्रथम





नगर – सन २०२५ च्या सीबीएसई बोर्ड परीक्षांमध्ये आयकॉन पब्लिक स्कूलच्या १२ वी च्या विद्यार्थ्यांनी प्रशंसनीय कामगिरीची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेत संग्राम बोरूडे याने ९५.२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाची कामगिरी केली. वाणिज्य शाखेत तन्मयी पादीर हिने ९३.८ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळविला.

विज्ञान शाखेत संग्राम बोरुडे यानेने प्रभावी ९५.२ टक्के गुणांसह आघाडी घेतली, भौतिकशास्त्र विषयात ९९ आणि शारीरिक शिक्षणात ९७ गुण मिळवले. त्याच्या पाठोपाठ सौम्या हिने एकूण ९४ टक्के गुणांसह रसायनशास्त्रात ९८ आणि पीई मध्ये ९६ गुण मिळवले. दीपश्री कर्पे हिने ९३.८ टक्के गुण मिळवले, रसायनशास्त्रात १०० पैकी १०० गुण कामगिरी तिने केली.

विज्ञान शाखेतील यशस्वी विद्यार्थी व त्यांना मिळालेले एकूण गुण पुढीलप्रमाणे अर्णव फाळके – ९३.२, विनीत दिवटे – ९२, राज मुथा – ९१ (शारीरिक शिक्षणात ९७), अभय मुथा – ८९, ऋतुजा मुखेकर – ८८.६, शुभम पिंपळे – ८७.८, तनिष्क भंडारी – ८६.८, वेदांत लोहकरे – ८६, कनक पठारे – ८४.८, मेघा शेरकर – ८२.८, आफिया सय्यद – ८०.८ (पीई मध्ये ९९), मोहमुधा नबीहा – ८०.८ व रोनक गांधी – ८० टक्के गुण.

वाणिज्य शाखेतील उल्लेखनीय विद्यार्थी व त्यांना मिळालेले गुण टक्केवारीत पुढीलप्रमाणे – तन्मयी पादीर – ९३.८, सारा सबलोक – ९३.४, सर्वेन्द्र सिंग – ८८.४, गौरी पटवा ८१.२ टक्के गुण मिळवून चांगली कामगिरी केली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे शरद मुथा एज्युकेशन ट्रस्टचे चेअरमन अशोक मुथा, ट्रस्टी निर्मल मुथा व अमित मुथा, कर्नल आर.सी. राणा, आराधना राणा, प्राचार्या दीपिका नगरवाला आदींसह शिक्षकांनी अभिनंदन केले.

# नगरमध्ये २४ मे रोजी कथाकट्टाचे 'भय इथले संपत नाही' नाट्य प्रयोग

नगर – ब्लॅक बॉक्स क्रिएशन्स निर्मित, कथा कट्टा सादर करीत आहे. 'भय इथले संपत नाही' हा गुढ व भय कथाचा नाट्य अनुभव देणारा अभिवाचनाचा प्रयोग ऊर्जा रंग भवन, अहिल्यानगर येथे २४ मे रोजी संध्याकाळी ७. ३०वा सादर होणार आहे. या दीर्घांक प्रयोगामधे आशुतोष उकिडवे आणि नारायण धारप व रत्नाकर मतकरी या लेखकांच्या कथांचे अभिवाचन या प्रयोगात प्रभावीपणे केले जाते.

नेपथ्य, प्रकाश योजना आणि संगीताचा परिणामकारक उपयोग यामुळे प्रेक्षकांना प्रयोगाचा उत्तम अनुभव मिळतो. पात्रांच्या गरजेनुसार सुसंगत रंगभूषा आणि वेशभूषाचा वापर केला आहे. कलाकार वेगवेगळ्या भूमिका साकारून रसिकांना खिळवून ठेवतात. या प्रयोगाची संकल्पना आणि दिग्दर्शन देवेंद्र भिडे यांनी केले आहे.

मानसी जोगळेकर, पूजा गिरी, डॉ. समीर डोलारे, पराग फडके, माधव सोमण, रोमा गिरी, मधूर डोलारे, राजा उत्तूरकर, रेणुका भिडे, देवेंद्र भिडे हे अभिवाचक कथा सक्षमपणे प्रेक्षकांनपर्यंत पोचवतात. सचिन यंदे, आरोही डोलारे, अंतरा डोलारे यांची ही साथ मिळते. प्रकाशयोजना योगेंद्र साने, संगीत संयोजन – निरंजन देशपांडे, रंगभूषा – नरेंद्र वीर या अभिवाचन प्रयोगाला प्रेक्षकांचा प्रतिसाद मिळत आहे. यापुर्वी पुणे, मुंबई येथे प्रयोग झाले असून आता अहिल्यानगर मध्ये पहिला प्रयोग होत आहे. 'भय इथले संपत नाही' एक अनपेक्षित पध्दतीने भय व गूढ कथांचा नाट्यानुभव देणारा अभिवाचनाचा हा प्रयोग पाहण्यास प्रेक्षकांनी जरूर यावे. सादरीकरण कालावधी सलग ९० मिनिटे आहे. माहितीसाठी आणि तिकिटासाठी मो.८६००२४४०००.



दिनेश लोंढे यांना अमेरिकेची मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करताना भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षा तृप्ती देसाई.

# अमेरिकेची मानद डॉक्टरेट पदवी दिनेश लोंढे यांना प्रदान

नगर – अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी हॉलीवुड युएसए यांच्या वतीने श्रीकांत शिंदे फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक दिनेश लोंढे यांना डॉक्टरेट इन सोशल वर्क ही मानद पदवी प्रदान करण्यात आली आहे.

नुकत्याच पुणे येथे एका कार्यक्रमात ही पदवी भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक अध्यक्षा तृप्ती देसाई यांच्या हस्ते दिनेश लोंढे यांना प्रदान करण्यात आली.

डॉ. दिनेश लोंढे म्हणाले की, सामाजिक कार्य करत असताना अनेक अडथळे आले, पण समाजहितासाठी काम करण्याची जिद्द कधीच कमी झाली नाही. ही डॉक्टरेट पदवी म्हणजे माझ्या कार्याची आंतरराष्ट्रीय पातळीवर झालेली दखल आहे. हा सन्मान माझा नसून माझ्यासोबत चालणार्या सर्व सहकार्यांचा आहे. पुढेही समाजासाठी निःस्वार्थ सेवा करत राहण्याची माझी बांधिलकी मी कायम ठेवणार आहे.

# सीबीएसई दहावी बोर्ड परीक्षेत चित्रकुटच्या विद्यार्थ्यांची कामगिरी



श्रावणी कर्डिले | सिफा शेख | सृष्टी जगताप | भावेश पठारे | देवेश पंडित

नगर – सीबीएसई बोर्डाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेत चित्रकुट इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करून उत्कृष्ट शैक्षणिक परंपरा कायम राखली आहे. श्रावणी कर्डिले हिने ९४ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याची कामगिरी केली आहे.

शाळेतील सिफा शेख हिने ९० टक्के, सृष्टी जगताप हिने ८७.२ टक्के, भावेश पठारे याने ८४.४ टक्के गुण तर याने ८३.२ टक्के गुण मिळवले. देवेश पंडित याने आयटी विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून मोठी कामगिरी केली.

संस्थेचे संचालक संजय चव्हाण म्हणाले, चित्रकुट इंटरनॅशनल स्कूलच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा आम्हाला अभिमान आहे. मुलांच्या भावी आयुष्याचा भक्कम पाया रचण्याचे काम शाळेत केले जाते. त्यामुळेच पालकही विश्वासाने शाळेच्या उपक्रमांना प्रोत्साहन देतात. सीईओ अशोक सचदेव यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकांनी उत्कृष्ट निकालासाठी विशेष परिश्रम घेतले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शिक्षकांचे सचदेव यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# अपहार प्रकरणातील डॉ. अनिल बोरगे यांचे नाव वगळण्यास न्यायालयात हरकत घेणार : आयुक्त यशवंत डांगे

नगर – आरोग्य विभागातील अपहार प्रकरणातील गुन्ह्यातून डॉ. अनिल बोरगे यांचे नाव वगळण्याबाबत पोलिस प्रशासनाने न्यायालयात दाखल केलेल्या पत्राला महानगरपालिकेमार्फत कायदेशीर हरकत व आक्षेप घेतला जाणार आहे. गुन्ह्यातून त्यांचे नाव वगळण्याचा निर्णय अद्याप न्यायालयाने दिलेला नाही. या प्रकरणी महानगरपालिका न्यायालयात योग्य ती भूमिका मांडेल, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली आहे. दरम्यान, डॉ. बोरगे यांनी स्वतःच हा अपहार उघड केल्याचा दावा ते करत असतील, तर आरोग्य विभागाचे जबाबदार अधिकारी व विभागप्रमुख म्हणून त्यांनी गुन्हा का दाखल केला नाही? अद्याप अपहरणाची रक्कम वसूल का झाली नाही? डॉ. बोरगे यांनी दीड वर्ष यावर मौन का बाळगले? त्यांना आत्ताच पश्चातबुद्धी कशी सुचली? असे सवालही यशवंत डांगे यांनी उपस्थित केले आहेत.

# अर्थजगत




## अल्पकालीन-दीर्घकालीन भांडवली नफ्यातोट्याचं करगणित

**भा**रतीय शेअर बाजारामध्ये गेल्या काही महिन्यांपासून मोठे चढ-उतार सुरू आहेत. त्यामुळे बऱ्याच गुंतवणूकदारांना एका बाजूला काही शेअर्समधून नफा होत आहे, तर दुसऱ्या बाजूला नुकसानही सहन करावे लागले आहे. यामुळे त्यांच्यात काहीसे तणावाचे वातावरण असणे स्वाभाविक आहे. पण शेअर बाजारामध्ये झालेले नुकसान योग्य प्रकारे वापरल्यास त्याचा आयकर कमी करण्यासाठी चांगला फायदा होऊ शकतो.

■ विनिता शाह

आर्थिक वर्ष २०२५ह२६ मध्ये तुमच्याकडे जर भांडवली नफा (कॅपिटल गेन) आणि भांडवली तोटा (कॅपिटल लॉस) दोन्ही असतील, तर आयकर कायद्यात कर कमी करण्यासाठी स्पष्ट तरतुदी आहेत. गुंतवणूकदारांनी हे नियम समजून घेतले, तर भांडवली नफ्यावर लागणारा कर अगदी शून्यही करू शकतो. 'बिझनेस टुडे'मध्ये दिलेल्या एका लेखामध्ये करसल्लागार सीए नियती शहा सांगतात की, फक्त कायद्यातील नियम माहित असून उपयोग नाही, तर त्यांचा योग्य प्रकारे आणि वेळेत वापर झाला पाहिजे. शेअर बाजारातील नफा-तोटा, कर दर, मालमत्तेचा प्रकार (इक्विटी की नॉन-इक्विटी) आणि वेळेत आयकर विवरणपत्र भरले गेले आहे की नाही, हे सगळं विचारात घ्यावं लागतं.

**भांडवली तोटा वापरून कर कसा कमी करता येतो?**

दीर्घकालीन भांडवली तोटा (लॉंग टर्म कॅपिटल लॉस अर्थात एलटीसीएल) हा फक्त दीर्घकालीन नफा (लॉंगटर्म कॅपिटल गेन म्हणजेच एलटीसीजी) कमी करण्यासाठी वापरता येतो.

अल्पकालीन भांडवली तोटा (शॉर्ट टर्म कॅपिटल लॉस म्हणजेच एसटीसीएल) हा अल्पकालीन आणि दीर्घकालीन या दोन्ही प्रकारचा नफा कमी करण्यासाठी वापरता येतो. जर एखादा तोटा वापरूनही उरला, तर तो पुढील ८ वर्षांसाठी पुढे नेऊन भविष्यातील नफा कमी करण्यासाठी वापरता येतो. पण यासाठी एक अट आहे, ती म्हणजे हा तोटा वेळेत दाखल केलेल्या आयकर विवरणपत्रात (३१ जुलैपूर्वी) नमूद केलेला असावा.

**आता कर वाचवण्यासाठी कोणत्या क्रमाने तोटा कमी करावा, हे पाहूया.**

यामध्ये अल्पकालीन तोटा(एसटीसीएल) आधी वापरावा. कारण कारण अल्पकालीन नफ्यावर जास्त म्हणजेच २० टक्के आयकर आकारला जातो. त्यामुळे तो कमी करण्याचा पर्याय आधी निवडावा. त्यानंतर दीर्घकालीन तोटा वापरावा. उरलेला दीर्घकालीन भांडवली नफा कमी करण्यासाठी वापरावा. त्यामुळे एसटीसीएल वाया जाणार नाही. सूचीबद्ध इक्विटीवर मिळणाऱ्या दीर्घकालीन भांडवली नफ्यावर (एलटीसीजी) सेक्शन ११२ ए अंतर्गत १.२५ लाखाची सूट मिळते. त्यामुळे ही सूट घेतल्यानंतरच उरलेला नफा कमी करा. यासाठी एक उदाहरण आपण पाहूया. समजा तुमचा अल्पकालीन तोटा (एसटीसीएल) ३,००,००० रुपये आहे आणि दीर्घकालीन तोटा (एलटीसीएल) २,००,००० रुपये आहे; तर दुसरीकडे अल्पकालीन भांडवली नफा (एसटीसीजी) २,५०,००० रुपये आहे आणि दीर्घकालीन नफा (एलटीसीजी नोंदणीकृत समभागांमधून मिळालेला) ३,५०,००० रुपये आहे. तर अशा परिस्थितीत आयकर किमान पातळीवर आणण्यासाठी किंवा शुन्यावर आणण्यासाठी कशा प्रकारे मांडणी करावी हे पाहूया.

➔एलटीसीजीवर म्हणजेच दीर्घकालीन भांडवली नफ्यावर १.२५ लाखाची सूट मिळते. त्यामुळे तुमच्या ३.५ लाखांपैकी उरतात २.२५ लाख लाख.

➔यानंतर एसटीसीएलमधून (३ लाख) एसटीसीजी (अडीच लाख रुपये) वजा केल्यानंतर उरतात ५० हजार रुपये आणि एसटीजीसाठीचे करदायित्व शून्यावर आले.

➔आता २.२५ लाख रुपयांच्या एलटीसीजीमधून एसीटीसीएलचे राहिलेले ५० हजार रुपये वजा करा. आता उरलेल्या १.७५ लाखांसाठी २ लाखांचा एलटीसीएल वापरा. त्यामुळे एलटीसीजीसाठीचे करदायित्वही शुन्यावर येईल.

आता एलटीसीएलमधील २५ हजार रुपये शिल्लक राहतील, ते पुढील वर्षासाठी वापरता येतील. यामुळे करपात्र अल्पकालीन नफा, करपात्र दीर्घकालीन नफा, भरावयाचा हे सर्व शुन्यावर येतील आणि पुढील वर्षासाठी शिल्लक तोटा २५ हजार रुपये राहील. तो पुढील वर्षीच्या दीर्घकालीन नफ्यामधून वजा करता येऊ शकेल. सांगण्याचे तात्पर्य इतकेच की, तुमच्याकडे भांडवली तोटा असेल, तर तो फक्त आर्थिक नुकसान नसतो. त्याचा योग्य वापर केल्यास तो आयकराचे दायित्व कमी करण्यास मदत करु शकतो. यासाठी शेवटच्या तिमाहीत पोर्टफोलिओचं पुनरावलोकन करणे आणि कर सल्लागाराचा सल्ला घेणे आवश्यक ठरते. ◆◆◆

## कॅन्सर विमा खरेदी करण्यापूर्वी...

**क**र्करोग अर्थात कॅन्सरसारख्या गंभीर आजाराच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर, अनेक विमा कंपन्या आता स्वतंत्र कॅन्सर विमा योजना देऊ करत आहेत. परंतु असा विमा खरेदी करण्यापूर्वी काही महत्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे अत्यावश्यक आहे. चुकीचा किंवा अपुरा विमा भविष्यात अपेक्षित मदत देऊ शकणार नाही.

**१. कॅन्सर विमा म्हणजे काय?**
कॅन्सर विमा ही एक खास योजना आहे जी फक्त कॅन्सरसारख्या गंभीर आजारासाठी कव्हर देते. यामध्ये साधारणत: निदानाच्या टप्प्यावर एक ठरावीक रक्कम विमाधारकास दिली जाते. ही रक्कम उपचार, औषधे, हॉस्पिटल खर्च, उत्पन्नातील घट भरून काढण्यासाठी वापरता येते.

**२. विद्यमान आरोग्य विम्याचा तपासा**
जर तुमच्याकडे आधीच एखादा सर्वसामान्य आरोग्य विमा असेल, तर त्यात गंभीर आजारांवरील काही मर्यादित कव्हरेज असू शकते. परंतु कॅन्सरसाठी विशेषतः, खर्च दीर्घकालीन आणि मोठ्या प्रमाणात असतो. त्यामुळे स्वतंत्र कॅन्सर कव्हरची आवश्यकता आहे का, हे आधी ठरवा.




● विमाजगत

**३. विमा रक्कम आणि टप्पे :** कॅन्सर विमा योजनांमध्ये सहसा निदानाच्या टप्प्यानुसार वेगवेगळ्या प्रमाणात रक्कम मिळते. उदाहरणार्थ, प्रारंभिक टप्पा, प्रगत टप्पा.

प्रत्येक टप्प्यावर किती रक्कम दिली जाईल, आणि पुढील टप्प्यावर कव्हर टिकणार का, हे नीट वाचा.

**४. प्रतीक्षा कालावधी (वेटिंग पिरियड) :** बहुतांश कॅन्सर विमा योजनांमध्ये ३ महिने ते १ वर्षांपर्यंत प्रतीक्षा कालावधी असतो. या काळात निदान झाल्यास दावा नाकारला जातो. त्यामुळे वाचून समजून घ्या की कव्हर केव्हा सुरु होईल.

**५. क्लेम प्रक्रियेतील पारदर्शकता :** काही विमा कंपन्या कॅन्सरच्या विशिष्ट प्रकारांनाच कव्हर करतात. काही योजनांमध्ये लसीकरणामुळे टाळता येणारे कॅन्सर (जसे की गर्भाशयाच्या मुखाचा कॅन्सर) कव्हर नसतो. त्यामुळे कोणते प्रकार कव्हर आहेत, याची स्पष्ट माहिती घ्या.

**६. प्रीमियम किती आणि किती काळासाठी? :** प्रीमियमचे प्रमाण वय, कव्हर रक्कम आणि वैद्यकीय इतिहासावर अवलंबून असते. काही योजना लांब मुदतीसाठी निश्चित प्रीमियम देतात, तर काही वर्षागणिक वाढवतात. प्रीमियम वाढीचे नियम वाचा आणि तुमच्या उत्पन्नाशी सुसंगत आहेत का ते बघा.

**७. उत्पन्नाचे संरक्षण :** कॅन्सरसारख्या आजारामुळे दीर्घकाळ नोकरी किंवा व्यवसायातून विश्रांती घ्यावी लागू शकते. अशा वेळी खर्च चालवण्यासाठी विमा रक्कम हाताशी असणे आवश्यक असते. काही विमा योजनांमध्ये मासिक उत्पन्नसदृश सुविधा असते.त्या पर्यायांचा विचार करा.

**८. अपवाद व मर्यादा :** आधीपासून असलेल्या आजारावर कव्हर मिळणार नाही.

काही टप्पे कव्हर नसतात. वैद्यकीय तपासण्या अनिवार्य असू शकतात.

तंबाखू/मद्य सेवन करणाऱ्यांसाठी प्रीमियम जास्त असतो.

**९. कुटुंबातील इतर सदस्यांसाठी**
बहुतेक कॅन्सर विमा योजना फक्त वैयक्तिक असतात. त्यामुळे पत्नी, पालक किंवा अपत्यांसाठी स्वतंत्र पॉलिसी घ्यावी लागते. कुटुंबासाठी एकत्रित योजना आहेत का, ते तपासा.

**१०. तुमच्या गरजा आणि इतिहासानुसार योजना निवडा**
जर कुटुंबात पूर्वी कॅन्सरचे रुग्ण असतील (उदा. आई-वडील, आजी-आजोबा), तर तुमचा जोखीम स्तर अधिक असतो. अशा वेळी उच्च कव्हर असलेली आणि कमी प्रतीक्षा कालावधी असलेली योजना निवडावी. ◆◆◆

**आणखी काय तपासाल?**
कंपनीची विश्वासार्हता आणि दाव्याची मंजुरी दर (क्लेम सेटलमेंट रेशो) तपासा
**पॉलिसीचे नियम व अटी संपूर्ण वाचा**
कोणते टप्पे आणि कॅन्सर प्रकार कव्हर आहेत ते स्पष्ट करून घ्या
आरोग्य विमा सल्लागाराचा सल्ला घ्या (आवश्यक असल्यास)
इंटरनेटवरील ग्राहक अनुभव, पुनरावलोकने (रिव्ह्यू) वाचा
कॅन्सर विमा ही एक शहाणपणाची गुंतवणूक आहे, पण ती माहितीपूर्वकच करावी. भावनिक किंवा जाहिरातींना बळी न पडता स्वतःच्या गरजा, जोखीम आणि आर्थिक स्थैर्य विचारात घेऊन योग्य पॉलिसी निवडा. ◆◆◆

## दहशतवादी हल्ल्याला विमासुरक्षेचं कवच मिळतं?

**प**हलगाम येथील दहशतवादी हल्ल्याची चर्चा आजही थांबलेली नाही. या सर्व चर्चांमध्ये विम्याच्या सुरक्षाकवचाविषयीही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. अशा प्रकारच्या दहशतवादी हल्ल्यात मरण पावल्यास किंवा घर अथवा वाहनांचे नुकसान झाल्यास विम्यातून भरपाई मिळते का? हा प्रश्न सर्वाधिक विचारला जात आहे.

टर्म इन्शुरन्ससह सर्वसाधारण जीवन विमा पॉलिसी दहशतवादी हल्ल्यामुळे होणाऱ्या मृत्यूवर कव्हरेज देतात. पॉलिसीधारक अशा घटनेत मृत झाला, तर पॉलिसी ॲक्टिव्ह असताना आणि प्रीमियम भरले गेले असल्यास, नॉमिनीला निश्चित रक्कम मिळते. दहशतवादी हल्ल्यामुळे होणाऱ्या मृत्यूला विमा कंपन्या नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यूप्रमाणेच मानतात. याला अपवाद असतो तो म्हणजे जर विमाधारक मृत्यूसमयी दहशतवादी कृत्य, दंगल, नागरी अशांतता किंवा गुन्हेगारी कृतीत सहभागी असल्याचे सिद्ध झाले, तर कव्हरेज नाकारले जाऊ शकते. काही पॉलिसी युद्धजन्य परिस्थिती, जैविक अथवा अणुहल्ला यांसारख्या गोष्टींचा अपवाद करतात;ह मात्र हे अपवाद सामान्यतः स्टँडर्ड पॉलिसीत नसतात.




तज्ज्ञांच्या मते, आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या १०ते१५ पट इतक्या रकमेची पॉलिसी घेणे योग्य ठरते. ही पॉलिसी घेताना प्रवासाचा इतिहास, व्यवसायाशी संबंधित धोके वगैरे सर्व माहिती प्रामाणिकपणे द्यावी, अन्यथा नंतर दावा नाकारला जाऊ शकतो. ज्यांच्यावर आर्थिक अवलंबित्व आहे, त्यांनी त्वरित जीवन विमा घ्यावा. विशेषतः धोकादायक किंवा संवेदनशील भागात राहणाऱ्या व्यक्तींनी याबाबत दिरंगाई करणे चुकीचे ठरू शकते.

➔**आरोग्य विमा :** दहशतवादी हल्ल्यात झालेल्या जखमांवरील उपचार खर्च आरोग्य विम्यात समाविष्ट असतो. अशा जखमांवरील हॉस्पिटलायझेशनचा खर्च स्टँडर्ड हेल्थ इन्शुरन्स पॉलिसीमध्येच कव्हर होतो; यासाठी वेगळे ॲड-ऑन घ्यायची गरज नसते.

➔**प्रवासी विमा :** प्रवासादरम्यान झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील जखमांवरील वैद्यकीय खर्चाची भरपाई प्रवास विमा पॉलिसीमध्ये होते. पॉलिसी कालावधीत प्रवासादरम्यान जर जखम झाली, तर हॉस्पिलटायजेशन एक्सपेन्सेस फॉर इलनेस अँड इंज्युरीच्या अंतर्गत आवश्यक वैद्यकीय उपचारांची भरपाई होते. याला अपवाद म्हणजे युद्ध, युद्धसदृश परिस्थिती, नागरी युद्धामुळे झालेल्या जखमा कव्हर होत नाहीत. तसेच विमाधारक स्वतः दहशतवादी कृत्य किंवा अपहरणात सहभागी असल्यास कव्हरेज नाकारले जाते. अशी पॉलिसी घेताना हाय सम इंशुअर्ड घ्यावी. जेणेकरून आपत्कालीन हॉस्पिटलायझेशन व एव्हॅक्युएशन खर्च यावर भरपाई मिळू शकेल. तसेच पॉलिसीतील अपवाद नक्की वाचावेत.

➔**होम इन्शुरन्स :** गृह विमा पॉलिसींमध्ये घर व त्यातील मालमत्तेचे दहशतवादी हल्ल्यामुळे झालेले नुकसान कव्हर होते. काही पॉलिसीमध्ये हे कव्हरेज बेस ऑफरिंगमध्येच असते; तर काहींमध्ये ते ऑप्शनल असते. साधारणतः १ कोटींच्या विमा रकमेवर एका वर्षासाठी दहशतवाद कव्हरेजचा प्रीमियम ७०० (टॅक्स वगळून) आहे.

➔**वाहन विमा :** कंप्लीट मोटर इन्शुरन्स पॉलिसीमध्ये दहशतवादी हल्ल्यामुळे वाहनाचे नुकसान कव्हर होते.

हे कव्हरेज 'ओन डॅमेज' सेक्शनअंतर्गत येते. या कलमानुसार दंगल, आंदोलने, घातक कृती व दहशतवादी कृत्यांमुळे झालेल्या नुकसानीपासून वाहनांचे संरक्षण करते. जर नुकसान होण्याच्या वेळी वाहनाचा वापर अवैध कार्यासाठी झाला असेल, तर दावा रद्द केला जाऊ शकतो. ◆◆◆

## मालकी हक्काचे प्रमाणपत्र का गरजेचे?

**फ**रीदाबादस्थित हॅमिल्टन हाइट्स या बिल्डरकडून ऑक्युपन्सी सर्टिफिकेट (ओसी) मिळवले नसतानाही ग्राहकांना फ्लॅटचा ताबा देण्यात आला. यामुळे नॅशनल कन्झ्युमर डिस्प्युट्स रिड्रेसल कमिशन (एनसीडीआरसी) ने त्यांना सेवा अयोग्यता व अन्यायकारक व्यापार पद्धतीसाठी दोषी ठरवले आहे. त्यामुळे फ्लॅटचा ताबा घेण्याआधी ओसी मिळालेला आहे की नाही हे तपासणे अत्यंत आवश्यक आहे.



**ओसी मिळवण्यात उशीर का होतो?**
- मंजूर आराखड्यापेक्षा भिन्न बांधकाम.
- अधिक बांधलेली चटई क्षेत्रफळ.
- डेव्हलपमेंट शुल्क, दंड, किंवा बाकीचे आर्थिक दायित्व पूर्ण न केल्यामुळे.
- न्यायालयीन वाद प्रलंबित असणे.

गृहनिर्माण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर एखाद्या गृहखरेदीदाराला मिळणारा सगळ्यात महत्त्वाचा कागद म्हणजे ऑक्युपन्सी सर्टिफिकेट (ओसी). हे प्रमाणपत्र स्थानिक नगररचना प्राधिकरणाकडून दिले जाते आणि त्या इमारतीचे बांधकाम सर्व कायदेशीर आणि नियोजित निकषांनुसार झाल्याचे सिद्ध करते. मंजूर आराखड्याचा भंग न करता, पाणीपुरवठा, मलनिस्सारण, वीज व्यवस्था, आणि अग्निसुरक्षेचे निकष पूर्ण झाल्यानंतरच हे प्रमाणपत्र दिले जाते. या प्रमाणपत्राशिवाय कोणतीही इमारत लीगली हॅबिटेबल मानली जात नाही.

➔**ओसी शिवाय ताबा घेण्याचे धोके :** काहीवेळा बांधकाम कंपन्या बांधकाम पूर्ण होताच ग्राहकांना फ्लॅटचा ताबा घेण्यास प्रवृत्त करतात, पण ओसी मिळवण्याकडे दुर्लक्ष करतात. ग्राहकांवर दबाव टाकण्यासाठी विविध मार्गांचा वापर केला जातो ह जसे की ताबा उशीर झाला तर देखभाल शुल्क आकारणे, लवकर ताब्यासाठी सूट देणे किंवा बुकिंग रद्द करण्याची धमकी देणे. अनेकदा ओसी मिळवण्यास वेळ लागत असल्याचे सांगून ग्राहकांना गोंधळात टाकले जाते. परंतु ओसीशिवाय ताबा घेतल्यास पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधा मिळण्यात अडचणी येतात, गृहकर्ज मंजूर होत नाही, आणि फ्लॅट विक्री करताना कायदेशीर अडथळे येतात. काही प्रकरणांमध्ये तर स्थानिक प्रशासन अशा बेकायदेशीर ताब्यामुळे रहिवाशांना बेदखलही करू शकते. पर्यावरण मंजुरी प्रमाणपत्र: पर्यावरणविषयक निकष पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र. ◆◆◆

## दागिन्यांच्या खरेदीसोबत मिळवा मोफत विमा

**भा**रतात सोनं केवळ गुंतवणूक म्हणून नाही, तर भावनिक मूल्य म्हणूनही खरेदी केले जाते. त्यामुळे त्याचं आपण संरक्षण करणे खूप महत्वाचं आहे. भारतात सोनं खरेदी करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. सध्या सोन्याचे दर सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे गुंतवणुकीसाठी सोनं खरेदी करणं फायद्याचं ठरतं. काही लोक सोन्यात गुंतवणूक करतात, तर काही थेट दागिने खरेदी करतात. दागिने हे लग्न, कार्यक्रम आणि समारंभात वापरता येतात. पण बऱ्याचदा या दागिन्यांच्या चोरीचा धोका असतो. बऱ्यास ठिकाणी साखळी हिसकावण्याच्या घटना वाढताना दिसत आहेत. यामुळे अनेकांचं नुकसान होतं. पण आपण ज्या दुकानातून सोनं खरेदी करता, तिथे दागिन्यांसाठी मोफत विमा मिळतो. ही गोष्ट आपल्याला माहितीच नसते. या योजनेचा फायदा कसा घ्यावा, हे जाणून घेऊ.




● माहीत आहे?

**दागिन्यांसोबत मोफत विमा**

जेव्हा आपण दागिन्यांची खरेदी करतो, तेव्हा बरेच दुकानदार आपल्याला त्याचा मोफत विमा देतात. हा विमा आपल्या दागिन्यांचं कसलंही नुकसान झाल्यास उपयोगी ठरतो. दागिने हरवले, लूटले, चोरी झाले, तर हा विमा आपल्याला आधार देतो. पण आपल्यातल्या बऱ्याच जणांना या योजनेची माहितीच नसते. त्यामुळे ते याचा लाभ घेऊ शकत नाहीत. मालाबार, तनिष्क, सेन्को गोल्ड अँड डायमंड्ससारखे काही नामांकित दुकानदार सोन्याच्या खरेदीसोबत मोफत विमाही देतात. आपल्याला याची माहिती असायला हवी.

**विम्यात ग्राहकाला काय मिळतं?**

हा मोफत विमा ग्राहकाच्या दागिन्यांचं होणाऱ्या अनेक प्रकारच्या नुकसानापासून संरक्षण करतो. भूकंप, पूर, युद्ध, दंगल, साखळी हिसकावणे, दरोडा, अपघात यांसारख्या घटनांमुळे दागिन्यांचं नुकसान झाल्यास विमा संरक्षण देतो. यामुळे आपण निश्चिंत राहू शकतो. हा विमा आपल्या दागिन्यांना सुरक्षित ठेवण्यासाठी खूप महत्त्वाचा आहे.

**विम्याचं नूतनीकरणही महत्त्वाचं**

ग्राहकाला ज्वेलर्सकडून अथवा मान्यताप्राप्त सोन्याच्या दुकानातून मिळणारा मोफत विमा हा सहसा एक वर्षासाठीचा असतो. प्रत्येक दुकानदाराचे याचे नियम वेगवेगळे असतात. काही दुकानदार ही विमा सुविधा देतात, तर काही देत नाहीत. जर आपल्याला या विम्याचं नूतनीकरण करायचं असेल, तर त्यासाठी अतिरिक्त शुल्क द्यावं लागतं. त्यानंतर त्याचं नूतनीकरण होतं.

**विमा दावा कसा करावा?**

विमा दावा करताना काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात. दागिने चोरी झाले किंवा हरवले, लुटले किंवा हिसकावून नेले तर तातडीनेपोलिसांबरोबरच विमा कंपनीलाही कळवावं. यासाठी कंपनीच्या टोल-फ्री क्रमांक किंवा ईमेलवर तातडीने संपर्क साधावा. विमा दाव्यासाठी पक्कं बिल, त्या दागिन्यांचे फोटो आणि इतर कागदपत्रं आवश्यक असतात. पडताळणीनंतर तुम्हाला काही कालावधीने विम्याची रक्कम मिळते. यात दागिन्यांचं पक्कं बिल सोबत असणंखूप महत्त्वाचं आहे. ते दागिने खरेदी करतानाच हक्कानं घ्यावं. ◆◆◆

## वाढत्या घरभाड्याचा सामना कसा कराल?

**बें**गळुरूमधील एका टेक प्रोफेशनलचा अनुभव सध्या सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला आहे. त्याला ७.५ टक्के पगारवाढ मिळाली, पण त्याच वेळी घरभाडं मात्र १० टक्क्यांनी वाढलं. अनेकांना हा अनुभव आपला वाटला. कारण अनेक शहरांमध्ये आज घरांचे भाडे पगाराच्या वाढीपेक्षा जास्त वेगाने वाढत आहे.

यामागे मुख्य कारण म्हणजे वाढती घरांची किंमत. मालमत्ता घेणं आता अधिक महाग झालं आहे. त्यामुळे अनेकांनी सध्या घर खरेदी करण्याचा विचार थांबवला आहे आणि ते भाड्याने राहणं पसंत करत आहेत. यामुळे भाड्याच्या घरांची मागणी वाढली आहे. जिथे मागणी जास्त असते, तिथे दरही वाढतात.

कोविडनंतर अनेक प्रकल्प उशिराने पूर्ण झाले. पण लोकांची गरज आणि मागणी कायम होती. परिणामी, मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी झाला आणि त्यामुळे भाड्यांचे दर चढले.

याशिवाय, कंपन्यांच्या 'ऑफिसमध्ये परता' या आयटी कंपन्या असणाऱ्या शहरांमध्ये भाडेतत्वावरील घरांची मागणी अधिक वाढली आहे. कोविडनंतर लोकांची घरांची पसंती बदलली आहे. आता मोठी घरे, गेटेड कम्युनिटीज, चांगल्या सुविधा यांची मागणी वाढली आहे. अशा चांगल्या दर्जाच्या घरांचे भाडे सामान्य घरे किंवा स्वतंत्र बिल्डिंग्सपेक्षा जास्त असते. पण याच वेळी, नवीन घरांचा पुरवठावेग कमी आहे. शहरांमध्ये जागेची उपलब्धता कमी आहे, बांधकाम प्रकल्प उशीराने पूर्ण होतात. कारण परवाने मिळवण्याच्या अडचणी आहेत. शिवाय, बरीचशी घरे प्रामुख्याने प्रिमियम (महागड्या) श्रेणीतील आहेत. यामुळे मध्यमवर्गासाठी भाडेतत्वावरील घरे महागडी झाली आहेत.



● आर्थिक नियोजन

**भाडेवाढीचा सामना कसा करावा?**

**लांब कालावधीसाठी करार करा :** जर तुम्हाला एखाद्या भागात दीर्घकाळ राहायचं असेल, तर २४ ते ३६ महिन्यांचा करार करा. त्यामुळे भाड्याच्या दरांमध्ये सातत्य राहील आणि दरवर्षी मोठी वाढ टळेल.

**योग्य स्थान निवडा :** केवळ ऑफिसजवळ पाहणं टाळा. नवीन विकसित होत असलेल्या भागांमध्ये पाहा. भाडं तुलनेत कमी असेल आणि पायाभूत सुविधा सुधारत असतील तर तो पर्याय विचारात घ्या. अर्थातच कौटुंबिक आणि आर्थिक गणिते मांडूनच असा निर्णय घ्या. प्रवासाचा वेळ तपासा, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था पाहा. खर्च आणि सोयीचा समतोल साधा.

**भाडं वाटाघाटी करून ठरवा :** शेजारील घरांच्या भाड्यांची माहिती घ्या. तुमचा चांगला भाडे भरण्याचा इतिहास सांगा. जर मालकाला वाटलं की तुम्ही विश्वासार्ह आहात, तर तो तुम्हाला नक्कीच प्राधान्य देईल. काही महिने ॲडव्हान्स भाडं देण्याची तयारी दाखवा. यामुळे अधिक चांगली ऑफर मिळू शकते. भाडं वाढवायचं नसेल, तरी उपयुक्त सुविधा जसे की पार्किंग, मेंटेनन्स, वायफाय यामध्ये सूट मागा.

**इतर पर्याय विचारात घ्या :** रूम शेअर करणे, थोडं छोटं घर घेणे, नो-ब्रोकरेज ॲप्स वापरणे हे पर्याय अवलंबा.

**काय चुका टाळाव्यात?**
- बाजारातील घरांच्या भाड्याची योग्य माहिती घेऊनच करार करा. अन्यथा जास्त भाडं भरावं लागू शकतं.
- कोणत्याही परिस्थितीत तुमच्या मासिक उत्पन्नाचा ५०% पेक्षा जास्त भाग फक्त भाड्याला जाऊ देऊ नका.
- करारामध्ये सर्व अटी स्पष्ट लिहिल्या असाव्यात. विशेषतः भाडेवाढीचा दर आणि पूर्वसूचना कालावधी नमूद असावा.
- शेवटच्या क्षणी करार वाढवण्याचा निर्णय घेऊ नका. अशावेळी पर्याय कमी मिळतात आणि मालक भाडं वाढवतो. थोडक्यात, आजच्या घरांच्या महागाईत, फक्त कमावणं पुरेसं नाही, तर शहाणपणानं खर्च नियोजन करणं आवश्यक आहे. घरभाड्याचं योग्य नियोजन केल्यास, तुम्ही चांगल्या ठिकाणी, योग्य किमतीत आणि दीर्घकाळ राहू शकता. ◆◆◆





इंडस्ट्रियल इस्टेट परिसरात सुरू असलेल्या ड्रेनेज लाईनच्या अपूर्ण आणि अर्धवट कामामुळे संपूर्ण वसाहतीत चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे.

# इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये चिखलाचे साम्राज्य

## अहिल्यानगर महानगरपालिकेच्या हलगर्जीपणामुळे कारखानदारांचे हाल, कामगार त्रस्त

नगर – इंडस्ट्रियल इस्टेट परिसरात सुरू असलेल्या ड्रेनेज लाईनच्या अपूर्ण आणि अर्धवट कामामुळे संपूर्ण वसाहतीत चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले आहे. अहिल्यानगर महानगरपालिका मार्फत हे काम सुरू असून, यामध्ये संपूर्ण एरियामध्ये खड्डे करून ठेवण्यात आले आहेत आणि त्यातील माती रस्त्यावर टाकण्यात आली आहे. कालच्या पावसामुळे ही माती चिखलात रूपांतरित झाली असून कारखानदार व कामगारांचे रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. दुचाकी वाहनधारकांची विशेषतः मोठी अडचण झाली असून, वाहन घसरून अपघात होण्याचेही प्रकार घडत आहेत. संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरली आहे आणि आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

कारखानदारांनी व इंडस्ट्रियल इस्टेटच्या मागील रहिवाशांनी अनेक वेळा महापालिकेकडे तक्रार केली, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. काम सुरू करून ४ महिने झाले तरी अजून काम पूर्ण झाले नाही. असे एका त्रस्त कारखानदाराने सांगितले. रस्त्यावर पसरलेली माती आणि चिखलामुळे कारखानदारांना व कामगारांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. कारखानदारांनी प्रशासनाकडे तात्काळ उपाययोजनेची मागणी केली आहे.

या परिस्थितीचा थेट फटका कारखानदारांना बसला आहे. अनेकांची वाहने, विशेषतः चारचाकी गाड्या आणि मालवाहू गाड्या, खड्ड्यांमध्ये अडकून पडल्या आहेत. परिणामी, औद्योगिक काम काज ठप्प झाले असून लाखोंचे नुकसान झालेले आहे. सकाळपासून माल घेऊन जाणारा ट्रक खड्ड्यात अडकून बसला आहे. ना कामकाज सुरू होतंय, ना माल पोहोचतोय. प्रशासनाने जर हे काम नीट केले असते, तर अशी वेळ आली नसती, अशी प्रतिक्रिया एका उद्योजकाने दिली.

### अस्वच्छतेचे साम्राज्य

केडगाव इंडस्ट्रियल इस्टेट परिसरात साचलेल्या सांडपाण्यामुळे आणि अस्वच्छतेमुळे कारखानदार व कामगार हैराण झाले आहेत. अहिल्यानगर महानगरपालिका मार्फत सुरू असलेले ड्रेनेजचे काम नीट न झाल्यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. या भागात पावसाचे पाणी तसेच सांडपाणी रस्त्यावर साचले असून, त्यामुळे दुर्गंधी, डासांचा त्रास आणि आरोग्यधोके निर्माण झाले आहेत. कारखानदारांनी आणि इंडस्ट्रियल इस्टेटच्या मागील रहिवाशांनी अनेक वेळा तक्रार करूनही महापालिका दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला जात आहे.

महापालिकेचे कर्मचारी काही वेळा येतात, पण केवळ पावसामुळे झालेली चिखल हटवून परत जातात. मुळात ड्रेनेज लाईनच चुकीच्या पद्धतीने टाकलेली आहे, असे एका स्थानिक कारखानदाराने सांगितले.

या परिसरात स्वच्छता आणि जलनिस्सारणाची योग्य व्यवस्था होईपर्यंत नागरिकांचे आरोग्य धोक्यात राहणार आहे. महापालिकेने तात्काळ पावले उचलून दोषी कंत्राटदारांवर कारवाई करावी, अशी मागणी आहे.



भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या दहावीच्या विद्यार्थीनी कु.समुध्दी कदम व स्वराज कदम या दोन्ही भगिनींनी दहावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळवून उत्तम यश मिळविले आहे. याबद्दल त्यांचा कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जालिंदर बोरुडे, राजेंद्र कदम, संजय सावंत आदी.

# शहर व परिसरात वादळी वाऱ्यासह मुसळधार बरसला अवकाळी पाऊस

## अनेक ठिकाणी घरांमध्ये शिरले पाणी; माळीवाडा बसस्थानकावर प्रवाशांचे झाले हाल

नगर – नगर शहर आणि परिसरात रविवारी (१८ मे) वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावत शहरभर पाणीच पाणी केले. कोतवाली पोलिस स्टेशनची संरक्षक भिंत कोसळली. कोठी परिसरातील काही घरात पाणी घुसले. बहुतांश ठिकाणाला तळ्याचे स्वरुप आले. माळीवाडा बसस्थानकात निवारा नसल्याने प्रवाशांची त्रेधातीरपट उडाली. काही ठिकाणी झाडांच्या फांद्या पडल्या. पावसामुळे शहरात विजेचा लपंडाव सुरु होता. वीज गायब होत असल्याने उकाडा आणखीच त्रासदायक ठरत होता.



शहर व परिसरात वादळी वाऱ्यासह मुसळधार झाल्याने कोतवाली पोलिस ठाण्याची कोसळलेली दगडी संरक्षक भिंत.

गेल्या काही दिवसांपासून नगर शहर आणि परिसरात अवकाळी पावसाने मुक्काम ठोकला आहे. दररोज कमी अधिक प्रमाणात पावसाची हजेरी लागत आहे. रविवारी (१८ मे) सकाळपासूनच शहर आणि परिसरात पावसाचे वातावरण निर्माण झाले. सकाळी शहरातील बहुतांश ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. सायंकाळी साडेचार ते पाच वाजेच्या सुमारास देखील पावसाने जोरदार हजेरी लावत सर्वत्र पाणीच पाणी केले. स्वस्तिक बसस्थानकात पाणी वाहिले गेले.

### महावितरणची यंत्रणा कोलमडली, शहरात वीज गायब

अवकाळी पावसामध्येच वीज वितरण व्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. आता ऐन पावसाळ्यात आणखी त्रास सहन करावा लागणार आहे. रविवारी सावेडी उपनगरात तसेच शहराच्या अनेक भागात मागील २४ तासांपैकी १८ तास वीज गायब होती. रात्री, सकाळी, दुपारी वीज नव्हती, यामुळे वीज ग्राहकांमध्ये प्रचंड नाराजीचा सूर आहे. महावितरण कार्यालयात फोन करुनही प्रतिसाद मिळत नव्हता. त्यामुळे ग्राहकांच्या संतापात अधिकच भर पडली.

एकीकडे पावसाचा कहर सुरु असताना शहरातील वीज वितरण व्यवस्था कोलमडली. सावेडी, कल्याण रोड, बालिकाश्रम रोड, बोल्हेगाव, केडगाव, मुकुंदनगर या भागात रात्रभर वीजपुरवठा खंडीत होता. शनिवारी दिवसभर पावसाळ्यापूर्वीच्या दुरुस्तीच्या कामासाठी वीज पुरवठा खंडित करण्यात आलेला होता, त्यानंतर मध्यरात्री व रविवारी दिवसभर शहरातील बहुतांश भागात वीज खंडीत होत होती.

माळीवाडा येथील जुने बसस्थानक जमीनदोस्त करण्यात आले. मात्र बसची ये–जा सुरुच आहे. या पावसाचा येथील प्रवाशांना दणका बसला. निवारा नसल्यामुळे प्रवाशांची एकच धांदल उडाली. कोठी परिसरातील काही घरात पाणी शिरले. हे पाणी काढताना नागरिकांची दमछाक झाली. दिवसभरात झालेल्या जोरदार पावसाने माळीवाडा बसस्थानक, शिवाजी पुतळा, जिल्हा बँक मुख्यालय परिसर, टिळक रस्ता, सक्कर चौक, माळीवाडा वेस, पटवर्धन चौक, आशा टाकी चौक, कोठला परिसर, बागडपटटी, रामचंद्र खुंट, डीएसपी चौक, मुकुंदनगर, तारकपूर बसस्थानक आणि परिसर, सिंधी कॉलनी, सावेडी, एमआयडीसी परिसरासह विविध ठिकाणी पाणी साचले आहे. त्यामुळे शहराला तळ्याचे स्वरुप आले आहे. हवामान खात्याने २१ मे पर्यंत वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे आणखी तीन दिवस जनतेला त्रास सहन करावा लागणार आहे.

### 'कोतवाली'ची संरक्षक भिंत कोसळली

या पावसामुळे शहरातील सखल भागात पाणी साचले होते. जोरदार वाऱ्यामुळे मिस्किन मळा, भवानीनगरातील रामकृष्ण शाळा परिसरात झाडे उन्मळून पडली. पावसामुळे आशा टॉकीज चौकातील कोतवाली पोलिस ठाण्याची संरक्षक भिंत कोसळली. यात कोणतीही जीवित अथवा वित्त हानी झालेली नाही.

कोतवाली पोलिस ठाण्याची ही दगडी संरक्षक भिंत होती ती कोसळली आहे. या भागातील रस्ता कॉँक्रीटीकरणाचे काम सुरू करण्यात येणार आहे. त्यापूर्वी ड्रेनेज लाइनची कामे सुरू आहेत. त्यामुळे या संरक्षक भिंतीलगत असलेल्या हातगाड्या हटवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे.

### फेरीवाले तसेच वाहनचालकांचे हाल

रस्त्यांवर पाणी साचल्यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. प्रोफेसर चौकात काही वाहने बंद पडल्याने वाहतूक कोंडी झाली होती. काही ठिकाणी वाहनचालकांनी रस्त्याच्या कडेला गाड्या उभ्या करून आडोशाला आसरा घेतला. पावसामुळे चितळे रोड, कापड बाजार, प्रोफेसर कॉलनी चौक परिसरातील फेरीवाले आणि पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागला. अनेकांनी दुकानांच्या आडोशाचा आणि इमारतींच्या छपरांचा आसरा घेतला. काही व्यापाऱ्यांनी आपली दुकाने तात्पुरती बंद केली.

# अहिल्यानगर शहरात अवजड वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद करा

## सिग्नलवर भीक मागण्यास बंदीची मागणी : चर्मकार विकास संघाचे जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदन

नगर – अहिल्यानगर शहरात दिवसेंदिवस वाढत असलेल्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर शहरातील अवजड वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद करण्याची व सिग्नलवर भीक मागणाऱ्यांवर बंदी आणण्याची मागणी करण्यात आली आहे. या मागणीसाठी चर्मकार विकास संघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष संजय खामकर आणि शहर जिल्हाध्यक्ष विनोद कांबळे यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी अरुण गाडेकर, संतोष कानडे, रुपेश लोखंडे, संतोष कांबळे, दिलीप कांबळे आदी उपस्थित होते.




निवेदनात म्हटले आहे की, अहिल्यानगर शहरात सध्या कॉँक्रिटीकरणांच्या माध्यमातून अनेक ठिकाणी मजबूत रस्त्यांचे काम सुरू असून, नव्याने उघडलेल्या रस्त्यांचे व जनतेचे स्वरक्षण महत्त्वाचे आहे सध्या वाहनांची वर्दळ वाढली आहे. विशेषतः अवजड वाहने भरधाव वेगाने धावत असल्याने अनेक वेळा अपघात घडत आहेत. काही अपघातांत निष्पाप नागरिकांचे जीव गेले असून, नुकताच प्रेमदान चौकात मोठ्या अवजड वाहनाचा घडलेला एक मोठ्या अपघात सुदैवाने जीवितहानी टळल्याने चर्चेचा विषय ठरला आहे. शहरातील चांगल्या रस्त्यांची अवस्था अवजड वाहनांमुळे खराब होऊ नये म्हणून नगरकरांनी काळजी घेणे महत्त्वाचे असून, नागरिकांच्या सुरक्षेसाठी शहरातून या वाहनांची दिवसा व रात्रीची वाहतूक पूर्णपणे बंद करण्याची गरज आहे.

शहरातील दुसरा गंभीर मुद्दा म्हणजे सिग्नलवर लहान मुले व महिलांकडून भीक मागणे हा असून, डीएसपी चौक व इतर सिग्नलवर ही मंडळी प्रवाशांना त्रास देत असून, सिग्नल सुरू झाल्यावरही रस्त्यावरून हटत नाहीत. दिवसभर भीक मागणाऱ्या महिला सोबत लहान मुलांना घेऊन फिरत असतात, या लहान मुलांचे भविष्य अंधारमय होत आहे. वाहतुकीला अडथळा निर्माण होतोच, शिवाय अपघाताची शक्यता देखील वाढत आहे. काहीजण वस्तू विक्रीच्या नावाखाली जबरदस्ती करताना दिसतात. ही मंडळी नेमकी कोठून येतात, कुठे राहतात याचा शोध घेणे अत्यावश्यक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

शहरात शिस्तबद्ध वाहतुकीसाठी, नागरिकांच्या सुरक्षेसाठी शहरातील अवजड वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद करण्याची व सिग्नलवर भीक मागणाऱ्यांवर बंदी आणण्यासाठी पोलीस प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी संघाच्या वतीने करण्यात आली आहे.



स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन २०२५ मध्ये छत्रपती संभाजी महाराज गुणवंत शिक्षिका पुरस्कार श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या आनंदवन पूर्व प्राथमिक बालवाडी विभागाच्या शिक्षिका सौ. साधना प्रसाद कुकडे –कुलकर्णी यांना खासदार निलेश लंके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# अहिल्यानगर येथील साधना कुकडे–कुलकर्णी यांना छत्रपती संभाजी महाराज गुणवंत शिक्षिका पुरस्कार

नगर – धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त निमगाव वाघा येथील स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन २०२५ मध्ये छत्रपती संभाजी महाराज गुणवंत शिक्षिका पुरस्कार अहिल्यानगर येथील श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाच्या आनंदवन पूर्व प्राथमिक बालवाडी विभागाच्या शिक्षिका सौ. साधना प्रसाद कुकडे–कुलकर्णी यांना अहिल्यानगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबददल देण्यात आला आहे.

स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष पै. नाना किसन डोंगरे, साहित्यिक व कवयित्री सरोजताई आल्हाट, साहित्यिक भरत सातपुते आदी उपस्थित होते.

या पुरस्काराचे स्वरूप सन्मान चिन्ह आणि ट्रॉफी असे आहे. या यशाबद्दल सौ. साधना प्रसाद कुकडे–कुलकर्णी यांचे श्री समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापिका सौ. धनश्री गुंफेकर, सर्व सहशिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# कामे करुन शिक्षण घेतलेल्या रात्रशाळेतील विद्यार्थ्यांची यशस्वी भरारी अभिमानास्पद

## प्रा. शिरीष मोडक यांचे प्रतिपादन; इयत्ता दहावीचे चार विद्यार्थी राज्याच्या गुणवत्ता यादीत; दीक्षा गवळी–गायकवाड रात्रशाळेतून राज्यात प्रथम; भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचा दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षेतील गुणवंतांचा सन्मान

नगर – रात्र शाळेतील महिला विद्यार्थिनींनी उत्तम गुण मिळवणं ही साधी गोष्ट नाही, तर शिक्षणात मोठा खंड पडल्यावर पुन्हा अभ्यासाकडे वळणं हा एक धाडसी निर्णय असतो. घरातील जबाबदाऱ्या, कौटुंबिक अडचणी, सामाजिक बंधनं या सगळ्यांवर मात करत महिला स्वत:ची गुणवत्ता सिध्द करत आहेत. जेंव्हा शिक्षण घेण्याचा दृढ निश्चय घेतला जातो, तेंव्हा यश निश्चितच मिळते. या यशामागे केवळ विद्यार्थिनींचा दृढनिश्चय नाही, तर शिक्षकांनी दिलेले समर्पित मार्गदर्शनही तितकंच मोलाचं आहे. राज्यातील रात्र शाळेत टॉप १० मध्ये ४ विद्यार्थिनींचा समावेश असणं हेच शिक्षकांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे यश असल्याचे शिरीष मोडक यांनी स्पष्ट केले.

हिंद सेवा मंडळ संचलित ज्युनियर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या एचएससी १२ वी बोर्डाच्या परीक्षेत कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. तर इयत्ता दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेतील रात्रशाळेच्या गुणवत्ता यादीत ४ विद्यार्थिनींनी स्थान मिळवले. दिवसभर काम करुन रात्री शिक्षण घेणाऱ्या या होतकरु विद्यार्थ्यांनी आपल्या जिद्दीने गुणवत्ता सिध्द केली.

मासूम संस्था (मुंबई) यांच्यावतीने राज्यातील रात्रशाळांचे इयत्ता दहावीमधील प्रविष्ट सर्व विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्यात येते. राज्यातील रात्रशाळांमधून प्रविष्ट विद्यार्थ्यांमधून टॉप टेन (१०) विद्यार्थी निवडण्यात येतात यामध्ये चार विद्यार्थी भाई सथ्था नाईट हायस्कूलचे आहेत. दीक्षा गवळी–गायकवाड (८६.८०%) हिने रात्रशाळेतून राज्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकाविला आहे. मंदा भोराडे–पवार (७६.८०%) यांनी राज्यात पाचवा तर इशिता भोर व जयश्री वैरागर–वाघमारे (७४.४०%) या दोन्हींनी आठवा क्रमांक मिळवला आहे.



हिंद सेवा मंडळ संचलित ज्युनियर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या एचएससी १२ वी बोर्डाच्या परीक्षेत कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

या गुणवंत विद्यार्थिनींचा संस्थेच्यावतीने भाई सथ्था नाईट हायस्कूलमध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, शालेय समितीच्या चेअरमन प्रा.ज्योतीताई कुलकर्णी, माजी चेअरमन डॉ. पारस कोठारी, नाईट हायस्कूलचे प्राचार्य सुनील सुसरे आदी उपस्थित होते.

ज्योतीताई कुलकर्णी म्हणाल्या की, शिक्षणाने नुसती डिग्री मिळत नाही, तर माणसाचा विचार प्रगल्भ होतात. विचार प्रगल्भ झाल्यास तुमच्या वागण्या–बोलण्यात बदल होतो आणि तो विचार तुम्हाला जीवनात पदोपदी निर्णय घेण्यास सक्षम बनवतो. म्हणून शिक्षण फक्त नोकरीसाठी नसून, जीवन घडविण्याचे साधन असल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. पारस कोठारी म्हणाले की, रात्र शाळेत शिक्षक तळमळीने आणि समर्पणाने गुणवत्तापूर्ण शिक्षण देतात. कठीण परिस्थितीतही गुरूंनी केलेले मार्गदर्शन हेच विद्यार्थ्यांच्या यशामागचं खरं कारण असतं. म्हणूनच रात्र शाळेतील यश हे खऱ्या अर्थाने गुरूंचेच आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांनी अभिनंदन केले. तर बारावीनंतर पुढील शिक्षणासाठी सारडा महाविद्यालयात प्रवेश घेण्याचे आवाहन केले.

सर्व यशस्वी विद्यार्थी–विद्यार्थिनींचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले तसेच वर्षभर शैक्षणिक मदत करणाऱ्या मासूम संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निकिता केतकर, संचालक कमलाकर माने, युवराज बोराडे व एसएससी प्रमुख शशिकांत गवस, गुरुप्रसाद पाटील यांचे प्राचार्य सुनील सुसरे यांनी आभार मानले व शैक्षणिक वर्ष २०२५–२६ यावर्षीचे इयत्ता आठवी ते बारावी कला, वाणिज्य शाखेसह नवीन देणे सुरू झाल्याची माहिती सर्व विद्यार्थी, पालकांना दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैशाली दुराफे यांनी केले. अमोल कदम यांनी आभार मानले.

ज्युनियर कॉलेज भाई सथ्था नाईट हायस्कूलचा १२ बोर्डाच्या परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे:– कला शाखा प्रथम– स्वाती दुंनगु–गोंधळी (६५.५०%), द्वितीय– प्रशांत भिसे (६२.५० %), तृतीय– ऋतुजा दौंड–गवळी (६२–१७ %), वाणिज्य शाखा प्रथम– वैशाली ओमासे–आंधळे (५६.५०%), द्वितीय– मयुरी जाधव–कराळे (५२.३३%), तृतीय– राकेश अष्टेकर (५०.३३%)

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे मानद सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा व माजी कार्याध्यक्ष अनंत फडणीस यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाप्रसंगी महादेव राऊत, शरद पवार, मंगेश भुते, अशोक शिंदे, कैलास करांडे, अनुराधा दरेकर, अनिरुद्ध देशमुख, अनिरुद्ध कुलकर्णी, अविनाश गवळी, मनोज कोंडेजकर, संध्या डोईफोडे, मंगल बोरुडे, भाग्यश्री चरकू आदींसह पालक विद्यार्थी उपस्थित होते.

